# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 April 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०७ एप्रिल २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- पाच किलो वजनी एलपीजी सिलिंडर्सचं दैनिक वाटप दुप्पट करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव', या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शुभारंभ
- राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णयांवर शिक्कामोर्तब
- नागपूर शहरात जिवंत स्फोटकांचा साठा हस्तगत-पोलिस तपास सुरू

आणि

- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव इथं सामाजिक समता सप्ताहाचं आयोजन

****

राज्यांमधल्या स्थलांतरित कामगारांना वितरीत केल्या जाणाऱ्या पाच किलो वजनाच्या एलपीजी सिलिंडर्सचं दैनिक वाटप दुप्पट करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना यासंदर्भात पत्र लिहिलं आहे. गेल्या महिन्यातील दोन आणि तीन मार्च रोजी खुल्या बाजारात पुरवठा केलेल्या अशा सिलिंडरची संख्या, हा कोटा दुप्पट करण्यासाठी आधार मानली जाईल.

ही सिलिंडर्स प्रत्येक राज्य सरकारला तेल विपणन कंपन्यांच्या सहकार्यानं पुरवली जाणार आहेत. दुर्गम गावांतून शिक्षण किंवा कामासाठी शहरांमध्ये आलेले विद्यार्थी आणि स्थलांतरित कामगार, त्यांच्या कायमच्या पत्त्याचा पुरावा देण्याऐवजी, फक्त

आपलं वैध ओळखपत्र दाखवून हे छोटं सिलिंडर मिळवू शकतात. शिवाय, शहरांमध्ये तात्पुरते वास्तव्य करणारे रहिवासी, म्हणजेच ज्यांच्याकडे कायमचा पत्ता नाही, ते देखील आपलं वैध ओळखपत्र सादर करून हे छोटं सिलिंडर मिळवू शकतात, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जागतिक आरोग्य दिन आज पाळला जात आहे. यानिमित्त सामाजिक माध्यमावरच्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, समाजाच्या आरोग्य सेवेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त सर्व डॉक्टर, परिचारिका आणि आघाडीच्या फळीतल्या कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.

****

जागतिक आरोग्य दिनाच्या आजच्या दिवशी राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव', या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह राज्याचे अन्य मंत्री उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातली आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

****

राज्यात इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रीम बुद्धिमत्ता, हा नवा आणि स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार, सध्याचं माहिती तंत्रज्ञान संचालनालय, या नव्या आयुक्तालयाकडे सोपवलं जाईल.

महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन केंद्राची एक कंपनी म्हणून स्थापना करायलाही आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे रस्त्यांबाबतची माहिती यंत्रणा, नगर रचना, जलयुक्त शिवार योजना, अशा विविध विभागांतल्या कामांना गती मिळण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र रेझिलिएंट डेवलपमेन्ट प्रोग्रॅम-अर्थात महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यालाही आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

यामध्ये खाजगी भांडवलाच्या मदतीनं आपत्ती व्यवस्थापनासाठी निधी देण्यात येणार आहे. या योजनेसाठी जागतिक बँकेकडून एकशे पासष्ट कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे.

भू-स्थानिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं प्रशासनात गती आणण्याच्या उद्देशानं महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर, या कंपनीची स्थापना करण्याला तसंच, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची वित्तीय पुनर्रचना करण्यालाही आज राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

यावर्षी जानेवारी ते एप्रिल या काळात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाची सविस्तर माहितीही आज मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. मागच्या वर्षी ऑक्टोबर ते डिसेंबर या काळात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाच्या भरपाईसाठी एकशे अठ्ठावीस कोटी पासष्ट लाख रुपये मदत देण्यात आल्याचं, यावेळी सांगण्यात आलं.

जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागाचे एक्केचाळीस प्रकल्प पूर्ण झाले, या प्रकल्पांमुळे अतिरिक्त दोन लाख पंचाण्णव हजार हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

****

२०२५-२६ या वर्षात एक लाख कोटी रुपयांच्या व्यवहाराचा टप्पा पार करणाऱ्या सारस्वत सहकारी बँक आणि अमूल, या संस्थांचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी अभिनंदन केलं आहे. हे यश सहकारी बँका आणि डेअरी क्षेत्रांसाठी ऐतिहासिक स्वरूपाचं तर आहेच, त्याशिवाय आत्मनिर्भर भारताच्या उभारणीला नवी शक्ती देणारं आहे, असं अमित शाह यांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे.

****

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या प्रकाश पर्वानिमित्त देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच केंद्रीय गृह मंत्री अमित शहा, यांनी प्रकाशपर्वानिमित्त तेग बहादूर यांना अभिवादन करत, जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर इथं सिंधी कॉलनीत गुरु तेग बहादूर जयंतीनिमित्त आयोजित अखंड पाठाची आज समाप्ती झाली. यावेळी गुरुबानीसह विविध धार्मिक कार्यक्रम यावेळी पार पडले. या ठिकाणच्या भव्य लंगरचा भाविकांनी लाभ घेतला.

****

नागपूर शहरात सीए रोडवरील दोसर भवन चौक परिसरात जिवंत स्फोटकांचा साठा आढळला. एका रहिवाशाने संशयास्पद बॅगची पोलिसांकडे तक्रार केली, बॉम्ब शोधक आणि नाशकपथकासह पोलिसांनी तातडीनं या ठिकाणी दाखल होत, सदा बॅगची तपासणी केली असता, त्यात, जिलेटीनच्या १५ कांड्या, ५८ डिटोनेटर आणि ८ कनेक्टर आढळून आले. ही बॅग गेल्या एक ते दीड महिन्यांपासून त्या परिसरात पडून होती. पोलिसांनी ही स्फोटके तातडीने सुरक्षित स्थळी हलवली. या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे. ही स्फोटकं मेट्रो स्टेशनच्या अगदी जवळ सापडल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे.

****

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव इथं उद्यापासून १४ एप्रिलपर्यंत सामाजिक समता सप्ताह राबवण्यात येणार आहे. या सप्ताहात विविध जनजागृतीपर कार्यक्रम, व्याख्यानं, आरोग्य तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर, तसंच विशेष उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात बिडकीन ग्रामीण रुग्णालयातल्या लाचखोर वैद्यकीय अधीक्षक आणि त्याच्या साथीदाराला अटक करण्यात आली. डॉ विजय दळवी असं या अधीक्षकाचं नाव असून, त्याने नारायण ब्राह्मणे या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्याच्या मार्फत शासकीय योजनेतून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी सहा हजार रुपये लाच मागितली होती. यापैकी बाराशे रुपये लाच घेतांना, ब्राह्मणे याला रंगेहाथ अटक करण्यात आली, त्यानंतर दळवी यालाही ताब्यात घेतल्याचं याबाबतच्या वृत्तात  म्हटलं आहे. या दोघांविरोधात बिडकीन पोलिस ठाण्यास गुन्हा नोंदवण्यात आला.

****

भोंदूबाबा अशोक खरातच्या कारस्थानात सामील असलेल्या, संवैधानिक पदांवरच्या व्यक्तींविरोधात कारवाई करावी, या मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीनं बीड जिल्ह्यात निदर्शनं करण्यात आली. अंबाजोगाई, धारूर, परळी, माजलगाव, शिरसाळा इथे या पक्षाच्या वतीनं निदर्शनं करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी सनदी लेखापाल डॉ प्रवीण पाटील यांची तर उपाध्यक्षपदी विधीज्ञ प्रफुल्ल अग्रवाल यांची निवड झाली आहे. डॉ पाटील यांनी याच संस्थेतून आपलं शिक्षण पूर्ण केलं आहे, संस्थेच्या विद्यार्थ्याची अध्यक्षपदी निवड होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदवी परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. विद्यापीठाशी संलग्नित बीड, धाराशिव, जालना आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या २४० परीक्षा केंद्रावर दोन लाख ८२ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत

****

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागानं आज शहरातल्या काही भागांत विशेष पाहणी मोहीम राबवली. कचऱ्याचं योग्य वर्गीकरण न करता तो रस्तावर टाकला जात असल्याची, तसंच कचरा नियमांचं उल्लंघन होत असल्याचचं यावेळी निदर्शनास आलं. अशा नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान एकूण तेरा हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

****

बीड नगरपालिकेत आज स्थायी समितीची बैठक झाली. नगराध्यक्ष प्रेमलता पारवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत घनकचरा, पावसाळापूर्व सफाई, तसंच इतर महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात गारपिटीने नुकसान झालेल्या आमरायांसह उर्वरित फळबागांचेही तातडीने पंचनामे होणार आहेत. आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी ही माहिती दिली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तसंच तालुका कृषी अधिकारी यांना फळबागांच्या पाहणीचे आदेश देण्यात आले आहेत.

****

बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर आज दुपारी जालना नजिक एका टँकरमधून गॅस गळतीची घटना घडली. सुरक्षेसाठी या रस्त्यावरची वाहतुक थांबवल्याने, वाहनांच्या रांगा लागल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****